औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाची दि. २१.५.९९ रोजी झालेल्या १०९ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत

---

बैठकीस खालील पदाधिकारी उपस्थित होते

| | |
|---|---|
| १] श्री. अनिल पोलकर | सभापती औरंगाबाद मंडळ |
| २] श्री. व्ही. एस. देशपांडे | मुख्य अधिकारी औरंगाबाद मंडळ |
| ३] श्री. ढाके, सहाय्यक रचनाकार, उपसंचालक नगररचना, औरंगाबाद विभाग कार्यालयांचे प्रतिनिधी | सदस्य प्रतिनिधी |
| ४] श्री. किसनराव दहिहंडे | सदस्य |
| ५] श्री. संजय लहानकर | सदस्य |
| ६] श्री. बाबासाहेब देशमुख | सदस्य |
| ७] श्री. व्यंकट पोतदार | सदस्य |
| ८] श्री. संजय नलावडे | सदस्य |
| ९] श्री. अभय चाटे | सदस्य |
| १०] श्री. प्रदीप साळुंखे | सदस्य |
| ११] श्री. पुरुषोत्तम शर्मा | सदस्य |
| १२] श्री. मनोष श्रीवास्तव | सदस्य |
| १३] श्री. अशोक बाहेती | सदस्य |

वंदे मातरम या राष्ट्रगितानंतर मंडळाच्या बैठकीस सुरुवात करण्यांत आली.

मंडळाचे मुख्य अधिकारी श्री. व्ही. एस. देशपांडे यांनी बैठकीत नमुद केले की, त्यांनी आजच [दि. २१.५.९९] रोजी मुख्य अधिकारी/औरंगाबाद मंडळया पदाचा पदभार स्विकारला आहे व सदर बैठकीच्या कामकाजाची सुरुवात मा. सभापती/औरंगाबाद मंडळ यांच्या परवानगीने करण्यांत येत आहे. त्यानंतर मा. सभापती यांनी मंडळाच्या सर्व नवनियुक्त सदस्यांचे व श्री. देशपांडे मुख्य अधिकारी यांचे पुष्पगुच्छ देऊन मंडळाच्या बैठकीत स्वागत केले.

बैठकीच्या कामकाजाची सुरुवात करण्यापुर्वी, नवनियुक्त मंडळाच्या मा. सभापती यांना व मा. सदस्यांना मंडळाचे विधी सहाय्यक तथा मिळकत व्यवस्थापक यांनी म्हाडा तथा औरंगाबाद मंडळा अंतर्गत राबविण्यांत येणा-या विविध गृहनिर्माण योजनांची माहिती दिली व तसेच मंडळाच्या एकुण कार्याची सविस्तर माहिती श्री. गोसावी यांनी मंडळासमोर नमुद केली. मंडळाच्या नियमीत बांधकाम कार्यक्रमा व्यतिरिक्त केंद्र शासनाच्या नविन राष्ट्रीय गृहनिर्माण धोरणानुसार मंडळाअंतर्गत राबविण्यांत येणा-या गृहनिर्माण योजनांची माहितीही श्री. गोसावी यांनी मंडळासमोर नमुद केली.

त्यानंतर मुख्य अधिकारी/औरंगाबाद मंडळ श्री. देशपांडे यांनी नमुद केले की, ज्या ठिकाणी मंडळाच्या योजनेतील गाळ्यांना जनतेकडून ठोस प्रतिसाद प्राप्त झाला आहे तेथे गाळ्यांचे बांधकाम सुरु झाले आहे. ज्याठिकाणी मागणी प्राप्त नाही त्याठिकाणी गृहनिर्माण योजना सुरु करता आल्या नाहीत. तथापी मागणी प्राप्त झाल्यास मराठवाड्यात विविध ठिकाणी योजना हाती घेता येतील अशी माहिती मुख्य अधिकारी औरंगाबाद मंडळ यांनी दिली. त्यानंतर झोपडपट्टी सुधार योजने अंतर्गत राबविण्यांत येणा-या कामांची माहिती ही मुख्य अधिकारी औरंगाबाद मंडळ यांनी मंडळास दिली.

मंडळाचे मा. सदस्य श्री. बाहेती यांनी मंडळाच्या सदस्यांचे अधिकार व कर्तव्य काय आहेत याबद्दल माहिती विचारली. यासंबंधी श्री. गोसावी, विधी सहाय्यक तथा मिळकत व्यवस्थापक यांनी माहिती सांगितले की, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम १९७६ व त्या अंतर्गत केलेले विनियम व शासनाचे परिपत्रक व म्हाडा मुंबईने वेळोवेळी परिपत्रकाद्वारे ज्या सुचना/आदेश मंडळास प्राप्त होतात त्यानुसार मंडळा अंतर्गत धोरणात्मक निर्णय घेतले जातात व काम केले जाते. तसेच मंडळाचे वार्षिक लेखे, व वार्षिक अंदाजपत्रक हे मंडळासमोर ठेवुन त्यास मंडळाची मान्यता घेऊन म्हाडा, मुंबईस मंजूरीसाठी पाठविले जातात. तसेच रु. ५०.०० लक्ष ते २.०० कोटी पर्यन्तच्या बांधकामाच्या निविदा मंजूर करण्याचे अधिकार मंडळास आहेत इ. माहिती श्री. गोसावी मिळकत व्यवस्थापक यांनी मंडळास दिली.

मंडळाचे सदस्य श्री. दहीहंडे यांनी औरंगाबाद शहरात कुठे कुठे बांधकाम कामे चालु आहेत याची माहिती विचारली यावर मुख्य अधिकारी औरंगाबाद मंडळ यांनी सांगितले की, औरंगाबाद येथे मुकूंदवाडी, मुर्तीजापूर व तिसगांव येथे गृहनिर्माण योजनांची बांधकाम चालु आहेत व या गाळ्यांसाठी जनतेकडून ठोस मागणी आहे अशीही माहिती दिली.

मंडळाचे सदस्य श्री. बाहेती यांनी मंडळाच्या चालु वर्षाच्या बजेटमधील एकुण तरतुदीविषयी माहिती विचारली यावर मुख्य अधिकारी औरंगाबाद मंडळ यांनी सांगितले की, चालु वर्षासाठी मंडळासाठी एकुण ... रु. ९३९.८५ लक्षाची तरतुद आहे व त्यानुसार चालु वर्षात १८२० गाळे

...

बांधावयाचे उद्दिष्टये आहे. मराठवाड्यात मंडळा अंतर्गत ज्या ठिकाणी शासकीय जमिनी मंडळाला प्राप्त होतील व ज्या ठिकाणी जनतेकडून घरासाठी ठोस मागणी मिळेल अशा ठिकाणी गृहनिर्माण योजना घेण्याचा विचार करण्यांत येईल असेही मुख्य अधिकारी औरंगाबाद मंडळ यांनी बैठकीत नमुद केले.

मंडळाचे सदस्य श्री. मनिष श्रीवास्तव यांनी भोकरदन जि. जालना येथे गृहनिर्माण योजना घेण्याचा विचार करावा असे प्रतिपादन केले. यावर मंडळाचे मुख्य अधिकारी/औरंगाबाद मंडळ यांनी सांगितले की, भोकरदन जि. जालना येथे जमिन ताब्यात आल्यावर तेथे योजना घेण्याचा विचार करण्यांत येईल.

मंडळाचे सदस्य श्री. घाटे यांनी परभणी येथील २५ गाळे अल्प उत्पन्न गट योजन बाबत सांगितले की, या योजनतील गाळ्यासाठी गाळ्यांची विक्री किंमत जास्त असल्यामुळे कांही गाळ्यांना ठोस मागणी प्राप्त होत नाही. त्यामुळे सदर गाळ्यांची किंमत कमी करून परत जाहिरातीद्वारे मागणी अजमाविल्यास कमी केलेल्या किंमतीनुसार गाळ्यांना परभणी येथे मागणी प्राप्त होऊ शकेल व गृहनिर्माण योजना घेता येऊ शकेल. यावर श्री. पांडे उपअभियंता यांनी मंडळास माहिती दिली की, परभणी येथील वरील योजनांची जाहिरात देऊनही गाळ्यांना प्रतिसाद प्राप्त होत नाही. गाळ्यांची अंतिम विक्री किंमत ही बांधकामासह त्या ठिकाणी पुरविण्यांत येणा-या इतर सर्व नागरी सुविधांसाठी येणारा खर्च गृहीत धरून काढण्यांत येते व अशी किंमत वाजवी ठेवण्याचा प्रयत्न करूनच काढण्यांत येते. त्यामुळे गाळ्यांच्या किंमती कमी करता येत नाही अशीही माहिती श्री. पांडे यांनी दिली. परभणी येथीलगाळ्यांसाठी मागणी प्राप्त व्हावी या हेतुने गाळा ताब्यात घेण्यापुर्वी भरावयाची आय. डी. पी. सुरूवातीस भरावी लागणारी रक्कम] रक्कम मात्र सुलभ हप्त्यात वसुल करण्याचा व त्यासाठी सवलत देण्याचा विचार करता येईल असे मुख्य अधिकारी/औ. मं. यांनी सांगितले.

मंडळाचे सदस्य श्री. घाटे यांनी विचारले की, झोपडपट्टी सुधारणा कार्यक्रमा अंतर्गत करण्यांत येणा-या कामावर मंडळाच्या अधिका-याचे नियंत्रण असते काय ? यासंबंधी मुख्य अधिकारी/औरंगाबादमंडळ यांनी माहिती दिली की, झोपडपट्टी सुधारणा कार्यक्रमा अंतर्गत केलेल्या कामाचे मंडळाचे उपअभियंता हे तपासणी करतात व त्यांच्या प्रमाणपत्रा नुसारच कामाच्या बिलाची रक्कम अदा केली जाते. या योजनेसाठी शासन डी. पी. डी. सी. मार्फत तरतुद करीत असते व त्याप्रमाणे महानगरपालिका/नगरपालिका यांनी त्यांनी केलेल्या झोपडपट्टी सुधारणा कामाच्यादेयकांची रक्कम अदा केली जाते.

मंडळाचे सदस्य श्री. नलावडे यांनी बीड येथे गृहनिर्माण योजना यापुर्वी कार्यान्वीत केली आहे. याबाबत माहिती विचारली. याबाबत मुख्य अधिकारी औरंगाबाद मंडळ यांनी सांगितले की, यापूर्वी बीड येथे पुरग्रस्तांसाठी गृहनिर्माण योजना कार्यान्वीत केली आहे. तसेच भविष्यात जर नगरपालिकेने म्हाडाला जमिन दिली तर किंवा बीड येथे शासकीय जमिन उपलब्ध झाल्यास बीडयेथे गृहनिर्माणयोजना प्रस्तावीत करण्याचा विचार केला जाईल. सदस्य श्री. नलावडे यांनी सांगितले की, बीड शहरात झोपडपट्टी सुधारणा योजने अंतर्गत कामे करण्यांत यावी.

वरील प्रमाणे बैठकीत माहिती दिल्यानंतर व वरीलप्रमाणे चर्चा झाल्यां नंतर बैठकीसमोरील विषयावर बाब टिप्पण्यावर निर्णय घेण्यासाठी विषयवार चर्चा खालील प्रमाणे सुरु झाली.

विषय क्र. १:

दिनांक ८.७.९८ रोजी झालेल्या १०८ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत कायम करणे.

---

ठराव क्र. ६६१

मंडळाच्या दि. ८.७.९८ रोजी झालेल्या १०८ व्या बैठकीच्या कार्यवृत्तांतावर चर्चा होऊन झालेल्या निर्णयानुसार कार्यवाही करण्याचा निर्णय घेऊन मंडळाच्या १०८ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत कायम करण्यांत आला.

विषय क्र. २: औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या कार्याविषयी माहिती.

सदर विषयासंबंधी बाब टिप्पणीमध्ये मंडळाच्या कार्यप्रणाली बाबत, बांधकाम, कार्यक्रमाबाबत व मंडळा अंतर्गत राबविण्यांत येणा-या विविध योजनांबाबत मंडळाचे मा. सभापती व सर्वमा. सदस्य यांनी नोंदे घेतली असे सांगितले व त्यानुसार असा निर्णय घेतला की,

ठराव क्र. ६६२

वरील विषयासंबंधी सादर केलेल्या बाब टिप्पणीतील औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्याविविध कार्याविषयी मंडळाने माहिती घेऊन नोंद घेतली असे ठरले.

विषय क्र. ३: मा. सभापती/औरंगाबाद मंडळ, यांचे परवानगीने येणारे आयत्यावेळेचे विषय.

विषय क्र. ३[१]: औरंगाबाद मंडळाचा सन १९९७-९८ या वर्षाचा वार्षिक लेखा मंजूरीस्तव.

या विषयाची बाब टिप्पणी व वार्षिक लेखा १९९७-९८ ची माहिती मा. मुख्य अधिकारी/औरंगाबाद मंडळ यांनी मंडळास दिली. मंडळाने त्याची नोंद घेऊन असा निर्णय घेतला की,

ठराव क्र. ६६३

सन १९९७-९८ च्या वार्षिक लेख्यास मंडळ सर्वानुमते मंजूरी देत आहे व सदरहू ठरावाच्या स्थायीकरणाची वाट न पाहता पुढील कारवाई करावी.

विषय क्र. ३[२] :- सेवानिवृत्त मिळकत व्यवस्थापक कै. आर. झेड. चव्हाण यांना वाटप केलेल्या निवासस्थानाचे सेवानिवृत्ती नंतरच्या वास्तव्यासाठी दि. १.६.९७ ते २६.५.९८ पर्यन्त आकारण्यात येणा-या भाड्याबाबत.

मंडळाचे विक्री सहाय्यक व प्रभारी व्यवस्थापक श्री. गोसावी यांनी सदर विषयाच्या बाब टिप्पणीबाबत सविस्तर माहिती मंडळास दिली. मंडळाचे माजी मिळकत व्यवस्थापक कै. आर. झेड. चव्हाण यांच्या वारसदार मुलीकडून सेवानिवासासाठी त्यांचे सेवानिवृत्तीनंतर ते त्यांचे मृत्युच्या तारखेपर्यन्त [म्हणजेच दि. १.६.९७ ते २६.५.९८]पर्यन्त दंडनीय भाडे आकारण्यासाठी सहानुभूतीपूर्वक विचार करावा असे मंडळाने एकमताने निर्णय घेतला. व उपमुख्य कार्यकारी अधिकारी/प्राधिकरण मुंबई यांनी सेवानिवृत्तीनंतरच्या कालावधीसाठी म्हणजे दि. १.६.९७ ते २६.५.९८ या कालावधीसाठी कै. चव्हाण यांनी सेवानिवासस्थान गाळा क्र. १०१ [८४ गाळे उच्च उत्पन्न गट देवगिरी कॉलेजजवळ औरंगाबाद] हे मंडळास रिक्त करून दिले नाही म्हणून आकारलेले दंडनीय भाडे रु. १०/- प्रति चौ. फुट न आकारता, सध्या कै. चव्हाण मयत झाल्यामुळे व त्यांच्या मुलीच्या अर्जाचा सहानुभूतीपूर्वक विचार करता त्यांचेकडून सेवानिवासस्थानाचे भाडे रु. १०७९/- दरमहा प्रमाणे आकारण्यात यावे व एकुण १२ महिन्यांसाठी रु. १२९४८/- एवढी रक्कम आकारण्यासाठी मंडळाने सर्वानुमते निर्णय घेतला व अशा आशयाची शिफारस प्राधिकरणाला करावी असे मंडळाने सर्वानुमते मान्यता दिली व मंडळाने त्यानुसार असा निर्णय घेतला की,

ठराव क्र. ६६४

---

सदर बाब टिप्पणीवर सविस्तर चर्चा होऊन मंडळाने ठराव मंजूर केला की, कै. चव्हाण हे मयत झाल्यामुळे व त्यांची मुलगी कु. अर्चना चव्हाण ही कमवती नसल्यामुळे व सर्व बाबींचा सहानुभूतीपूर्वक विचार करून कै. चव्हाण याचे सेवानिवासस्थान सेवानिवृत्तीनंतरच्या म्हणजेच दि. १. ६. ९७ ते २६. ५. ९८ या १२ महिन्याचे कालावधीसाठी प्राधिकरणाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांनी कळविल्यानुसार दंडनीय भाडे दरमहा रु. ३८१४/- प्रमाणे एकुण रु. ४५, ७७३/- न आकारता कै. चव्हाण यांच्या सेवाकाळात आकारण्यात येणारे भाडे दरमहा रु. १०४९/- प्रमाणे एकुण रु. १२९४८/- आकारण्यांत यावे व अशा प्रकारची ठरावानुसार शिफारस प्राधिकरणास कळवावी. सदर विषयाच्या ठरावाची स्थायीकरणाची वाट न पहाता पुढील कारवाई करावी.

विषयक्र. ३[३]:- मंडळाचे गाळे नियमीतीकरण/हस्तांतरण करण्याच्या ५ वर्षाचा कालावधी शिथील करणेबाबत.

मंडळाचे सभापती अनिल परोलकर यांनी मंडळाचे प्रभारी मिळकत व्यवस्थापक श्री. गोसावी यांचेकडे विचारणा केली की, मंडळाच्या विविध वसाहतीमधील गाळे सध्या हस्तांतरीत का करता येत नाहीत ? तेंव्हा मिळकत व्यवस्थापक श्री. गोसावी यांनी महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास [मिळकत व्यवस्थापन गाळ्यांची विक्री, हस्तांतरण व अदलाबदल ]विनियम १९८१ मधील विनियम क्र. २५ अनुसार पाच वर्षाचा मुदतबंद कालावधी असल्याचे सांगितले व त्यामुळे ज्या वसाहतीमधील गाळे वाटपास पाच वर्षे पुर्ण झालेली नाहीत. तेथील गाळे हस्तांतरीत/नियमीतीकरण करता येत नाही असे सांगितले.

मा. सभापती यांनी प्रतिपादन केले की, गाळेधारक गाळा ताब्यात घेताच त्याची बेकायदेशीर विक्री करतात व म्हाडास मात्र गाळ्यांच्या हस्तांतरणाची फीच्या स्वरूपात मिळणारा महसूल प्राप्त होत नाही या बेकायदा खरेदी-विक्री व्यवहारात ब-याच जणांची फसवणुकही होत असते. गाळेधारकांच्या सोयीच्या दृष्टीने पाच वर्षाच्या कालावधी कमी करून तो एक वर्ष करण्यांत यावे.

चर्चेस भाग घेतांना सदस्य श्री. अशोक बाहेती यांनी प्रतिपादन केले की, अशा प्रकारे एकदम कालावधी कमी केल्यामुळे ज्यांना घरांची आवश्यकता नाही असे लोक घरांसाठी मागणी नोंदवतील व नंतर त्याची विक्री करतील त्यामुळे म्हाडा स्थापण्याचा सरकारचा मुळ उद्देश सफल होणार नाही, त्यामुळे पाच वर्षा ऐवजी हा कालावधी किमान दोन वर्षापर्यंत कमी करण्यांत यावा अशी सुधारणा सुचविली.

श्री. दहिहंडे सदस्य यांनी हा प्रस्ताव पुढील बैठकीत निर्णयास्तव ठेवण्याबाबत प्रारंभी विनंती केली, परंतु मंडळाच्या सर्व सदस्यांच्या चर्चेअंती पाच वर्षाचा कालावधी एकदम शिथील न करता तो दोन वर्षां पर्यंत शिथील करण्याची सुचना केली.

शेवटी सर्वानुमते असा ठराव पारित केला की,

ठराव क्रं. ६६५ :-

" महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास [मिळकत व्यवस्थापन गाळ्यांची विक्री, हस्तांतरण व अदलाबदल] विनिमय १९८१ मधील विनिमय क्रमांक २५ अनुसार गाळ्यांच्या हस्तांतरण/नियमीतीकरणासाठी असलेली पाच वर्षांची विहीत अट शिथील करुन ती "दोन वर्ष" अशी करण्यांत यावी व तसा शिफारसवजा प्रस्ताव प्राधिकरणास/शासनास तात्काळ पाठवावा".

सदरहू ठरावाच्या स्थायीकरणाची वाट न पाहता कार्यवाही करावी.

बैठकीच्या शेवटी मंडळाचे सदस्य श्री. शर्मा यांनी बैठकीत विचारणा केली की, वसमत [जि. परभणी] येथे जुन्या योजनेमधील १० गाळे आहेत त्यापैकी ५ गाळे हे प्रिन्सीपॉल बेसीक ट्रेनिंग कॉलेज यांना दिलेले आहेत. सदर गाळे हे जरी कॉलेजला शासनाच्या धोरणाप्रमाणे विक्री केलेले असले तरी सदर ५ गाळे बंद आहेत त्याचा वापर होत नाही व हे गाळे [ म्हणजेच गाळ्याचे बांधकाम ] जिर्ण झाले आहे व मोडकळीस आले आहेत. तेंव्हा हया गाळ्यांची कॉलेजला आवश्यकता नसल्यामुळे ते मंडळास परत करण्याबाबत संबंधीत शिक्षण संस्थेस नोटीस द्यावी व भविष्यात म्हाडाने त्या जागेवर घरे बांधावीत वा भुखंड म्हणून विक्री करावीत.

याबाबत मंडळाचे सभापती श्री. अनिल पोलकर यांनी सदरहू वसमत मधील वसाहतीबाबतच्या सविस्तर माहिती जसे गाळे कोणास वाटप केलेले आहेत. केंव्हा केले आहेत व सध्या: स्थितीत त्या गाळ्यांचा वापर कोण करत आहे याबाबतची माहिती मिळकत व्यवस्थापक यांनी पुढील बैठकीत सादर करावी असे आदेश दिले.

यानंतर सामुहीक राष्ट्रगीत होऊन त्यानंतर मा. अध्यक्षांच्या परवानगी बैठक समाप्त झाली.

.....

औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,औरंगाबाद.

औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या सोमवार दिनांक १.११.९९ रोजी होणाऱ्या ११० व्या बैठकी समोरील विषय :-

विषय क्रमांक : २ :

औरंगाबाद मंडळान्तर्गत प्रगतीपथावरील गृहनिर्माण योजनांचा आढावा.

बाब टिप्पणी :

राष्ट्रीय गृहनिर्माण धोरणान्तर्गत औरंगाबाद मंडळास १५,४८५ गाळे बांधण्याचे उद्दिष्टे नेमून देण्यांत आलेले आहेत. त्यापैकी पहिल्या टप्प्यात विविध उत्पन्न गटातील ३०४८ गाळ्याचे बांधकाम करण्याचे प्रस्तावीत होते. गृहनिर्माण योजनेला प्रत्यक्ष मिळालेल्या प्रतिसादास अनुसरुन १५४८ गाळ्याचे बांधकाम सुरु करण्यांत आलेले आहेत. तसेच ३४३ गाळ्याचे बांधकाम लवकरच सुरु करण्यांत येणार आहे. याशिवाय मध्यम उत्पन्न गटान्तर्गत २५८ गाळ्याचे बांधकाम प्रगतीपथावर आहे. असे एकुण विविध उत्पन्न गटातील १८०६ गाळ्याचे बांधकाम प्रगतीपथावर आहे.

प्रगतीपथावरील योजनांची सद्यस्थिती सोबतच्या तक्त्यात सविस्तर दर्शविली आहे.

करिता आढावा घेणेसाठी सविनय सादर.

प्रगतीपथावरील योजनांची सद्यस्थिती दर्शविणारा तक्ता.

| अ.क्र. | योजनेचे नांव | १९९९-२००० उद्दिष्टे भौतिक | १९९९-२००० उद्दिष्टे आर्थिक | १-११-९९ पर्यन्तची साध्य. भौतिक | १-११-९९ पर्यन्तची साध्य. आर्थिक | शेरा. |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | ५४० गाळे अल्प उ.गट, गट नं. १०४/१, तीसगांव, औरंगाबाद. | ५१२ | २००.०० | – | १५१.०० | ३१० गाळे स्लाब, प्लास्टर २०० काम प्रगतीपथावर आहे. |
| २. | ३३६ गाळे अल्प उ.गट, स.नं. ७ मुकुंदवाडी औरंगाबाद. | ३३६ | १५०.०० | – | १२०.०० | २३२ गाळे स्लाब, प्लास्टर. ६५ गाळे काम प्रगतीपथावर आहे. |
| ३. | ६८८/३४५ गाळे अल्प उ.गट, स.नं. ३४/३५ मुर्तिजापूर, औरंगाबाद. | ३४५ | १५०.०० | – | ८०.०० | १५० गाळे स्लाब, प्लास्टर १०५ गाळे काम प्रगतीपथावर आहे. |
| ४. | १५३ गाळे अल्प उ.गट, ८० कौठा नांदेड. | १५३ | ६०.०० | – | ६०.०० | स्लाब २५ गाळे, प्लींथ बीम ११५ गाळे काम प्रगतीपथावर आहे. |
| ५. | ५४/२६ गाळे अ.उ.गट स.नं. १६४ उदगीर. | २६ | १०.०० | – | ९.०० | स्लाब ८ गाळे, काम प्रगती-पथावर आहे. |
| ६. | १४४/८० गाळे अत्यल्प उ.गट, स.नं. १६४ उदगीर. | ८० | २०.०० | – | १२.०० | स्लाब पर्यंत ३२ गाळे, छत ४८ गाळे, काम प्रगतीपथावर आहे. |
| ७. | १०८/८ गाळे अ.उ.गट, स.नं. ५३ गेवराई. | ८ | ५.०० | – | ३.०० | काम प्रगतीपथावर आहे. |
| ८. | २३०/८८ गाळे अत्यल्प उ.गट, स.नं. ५३ गेवराई. | ८८ | २५.०० | – | १०.०० | काम प्रगतीपथावर आहे. |
| | | १५४८ | ६३०.०० लक्ष. | | ४४५.०० लक्ष ... [अ] | |
| | **मध्यम उत्पन्न गट, योजना.** | | | | | |
| ९. | ४८ गाळे सि.टी.स.नं. २०७२१, औरंगाबाद. | ४८ | ९०.०० | – | ३९.०० | फ्रेमवर्क पूर्ण, बांधकाम प्रगती-पथावर आहे. |
| १०. | १७२ गाळे स.नं. ७, मुकुंदवाडी, औरंगाबाद. | १७२ | १५०.०० | – | १०.०० | काम प्रगतीपथावर आहे. |
| ११. | १४६/३८ गाळे गट नं. १०४/१ तीसगांव, औ"बाद. | ३८ | ३०.०० | – | — | काम प्रगतीपथावर आहे. |
| | | २५८. | २७०.०० | | ४९.०० लक्ष... [ब] | |
| | एकुण [अ] + [ब] | १८०६ गाळे | ९००.०० लक्ष | | ४९४.०० लक्ष. | |

औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाची सोमवार दिनांक १/११/९९ रोजी होणाऱ्या ११० व्या. बैठकीपुढील विषय :-

विषय क्रमांक : ३ : मंडळाच्या प्रस्तावीत योजनांविषयी माहीती.

बाब टिप्पणी :

राष्ट्रीय गृहनिर्माण धोरणान्तर्गत पहिल्या टप्प्यातील प्रस्तावीत एकुण ३०४८ गाळ्यापैकी १५४८ गाळ्याचे बांधकाम प्रगतीपथावर असून ३४३ गाळ्याचे बांधकाम लवकरच सुरु होणार आहे. उर्वरीत ११५७ गाळे विविध उत्पन्न गटान्तर्गत पुढील आर्थिक वर्षात सुरु करण्याचे प्रस्तावीत आहे.

तसेच मध्यम उत्पन्न गटान्तर्गत ३९७ गाळे व ५० गाळे उच्च उत्पन्न गट व ११ दुकाने पुढील आर्थिक वर्षात बांधण्याचे प्रस्तावीत आहे. असे एकुण १६०४ गाळे व ११ दुकाने विविध उत्पन्न गटान्तर्गत बांधण्याचे प्रस्तावीत आहे. या व्यतिरिक्त जमीन उपलब्धतेनुसार गाळ्याचे बांधकाम हाती घेण्यांत येईल.

सविस्तर तपशिल सोबतच्या विवरण पत्रात दर्शविण्यांत आला आहे.

मंडळाच्या माहितीस्तव सादर.

पुढील आर्थीक वर्षात मंडळाच्या प्रस्तावीत योजनांविषयी माहीती दर्शविणारा तक्ता.

| अ.क्रं. | योजनेचे ठिकाण. | योजना. | प्रस्तावीत गाळे. | शेरा. |
|---|---|---|---|---|
| १] | [अ] राष्ट्रीय गृहनिर्माण योजना. | | | |
| १] | गट क्रं. १०४/१, तिसगांव, औ"बाद. | अल्प उ. गट. | २८ गाळे. | |
| २] | स. नं. ५३ गेवराई. | – " – | १०० गाळे. | |
| ३] | स. नं. ५२७ परभणी. | – " – | १२३ गाळे. | |
| ४] | स. नं. १४ सेलू. | – " – | ६२ गाळे. | |
| ५] | स. नं. ९७/९८ लातूर. | – " – | ३९६ गाळे. | |
| ६] | गट नं. ८० कौठा, नांदेड. | – " – | ४४ गाळे. | |
| ७] | स. नं. १६४ उदगीर. | – " – | २८ गाळे. | |
| ८] | सन. १६४ उदगीर. | अत्यल्प उ. गट. | ६४ गाळे. | |
| ९] | स. नं. ५३ गेवराई. | – " – | १४२ गाळे. | |
| १०] | स. नं. १४ सेलू. | – " – | १०४ गाळे. | |
| | | | ११५७ गाळे ... [अ] | |
| | [ब] इतर गृहनिर्माण योजना. | | | |
| ११] | स. नं. ३४/३५ मुर्तिजापूर, औ"बाद. | मध्यम उ. गट. | १४५ गाळे. | |
| १२] | सिटी स. नं. १८३४८, औरंगाबाद. | – " – | १४ गाळे + ४ दुकाने. | |
| १३] | स. नं. ४५ शाहानुरवाडी | – " – | ६ गाळे + ७ दुकाने. | |
| १४] | स. नं. २७ शाहानुरवाडी. | – " – | १०० गाळे. | |
| १५] | गट नं. १०४/१ तीसगांव, औ"बाद. | – " – | १३२ गाळे. | |
| १६] | स. नं. २७ शाहानुरवाडी. | उच्च उ. गट. | ५० गाळे. | |
| | | | ३९७ गाळे + ११ दुकाने. ...[ब] | |

[अ] + [ब] १६०४ गाळे + ११ दुकाने.

या व्यतिरिक्त जमीन उपलब्धतेनुसार पुढील आर्थिक वर्षात योजना हाती घेण्यात येतील.

औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाची सोमवार दि. १/११/९९ रोजी होणा-या ११० व्या बैठकीसमोरील विषय.

---

विषय क्र. ४

मा. सभापती यांच्या परवानगीने आयत्यावेळेस येणारे विषय.